# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३**


जा.क्र.मनपा/वृ.प्रा/ ६७८ /२०२०-२१ दिनांक :- ३१/०३/२०२१

**प्रति,**
**सिस्टम ॲनालिस्ट,**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका.**

**विषय:- संकेतस्थळावर जाहीर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामातील बाधीत होणारी / धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामाची सोबत जोडलेली जाहीर नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबत :- जाहीर नोटीस प्रत.**

**(हंसराज मेश्राम)**
**प्र. उप मुख्य उदयान अधिक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा / 678 /2020-21 दिनांक :- 31 /03/2021

## // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या (नग) |
|---|---|---|
| 1. | भाईंदर (प.) उत्तन रोड, जयब्राम्हणदेव नगर येथील लक्ष्मी चाळ, रूम नं.2 येथील झाड असून सदर झाड भिंतीमध्ये वाढल्यामुळे भिंतीला तडा गेलेला या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. **(श्रीमती शोभा संतोष डिगरसे यांचे दि.17/02/2021 रोजीचे पत्र.)** | 01 पिंपळ |
| 2. | भाईंदर (प.) 150 फुट रोड येथील स्वर्ग हाईटस को.ऑ.हौ.सो.लि. यांच्या जागेतील झाड असुन सदर झाडांच्या मुळया सांडपाण्याच्या टाकीमध्ये गेल्यामुळे सांडपाण्याची टाकी लिकेज होत आहे. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. **(स्वर्ग हाईटस को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.26/02/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग गुलमोहर |
| 3. | भाईंदर (पू.) धर्मकाटा येथील गाळा क्र.7 मध्ये भिंतीमध्ये झाड वाढल्यामुळे भिंतीला तडा गेल्यामुळे झाड काढणे आवश्यक आहे. **(श्रीम.पूजा हरिश्चंद्र आमगावकर यांचे दि.03/03/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग पिंपळ |
| 4. | मौजे डोंगरी सर्व्हे क्र.43 अ (जुना), सर्व्हे क्र.51 (नविन), हिस्सा क्र.28 (अ), 28 (ब) या खाजगी जागेत नियोजित बांधकामामध्ये अडथळा निर्माण करीत असून सदरची झाडे काढणे आवश्यक आहे. **(श्री.हॅरल जॉर्जी बोर्जीस यांचे दि.30/10/2019 रोजीचे पत्र.)** | 01 चिंच |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त् (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

HSM
(हंसराज मेश्राम)
**प्र. उप मुख्य उद्यान अधिक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**